**आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत राज्यातील एक अस्थाई पद पुढे चालू ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिक आरोग्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अपदे २०१८/ प्रक्र-९४/आरोग्य ३(अ)**
गो.ते.रुग्णालय संकुल इमारत, १० वा मजला, ए विंग,
एल.टी.मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०३ एप्रिल,२०१८.

वाचा :-

**१) शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांकः अपदे २०१७/ प्रक्र-७२/आरोग्य ३(अ) दि.२२.०१.२०१८.**

२) आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्रमांक- संआसे/आस्था/कक्ष-५/टे-३/०१/अपदे/ ८८८-८९/१८, दिनांक-१.०३.२०१८

**३) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांकः पदनि-२०१६/प्रक्र.८/१६/आपुक, दि.०५.०३.२०१८.**

**शासन निर्णय:-**

उपरोक्त अ.क्र.१ येथील शासन निर्णयान्वये आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत राज्यातील एक अस्थाई पदास दि.१.०१.२०१८ ते दि.२८.२.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

आता या शासन निर्णयान्वये आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय मानसिक आरोग्य कार्यक्रमांतर्गत राज्यातील एक अस्थाई पदास दि.०१.०३.२०१८ ते दि.३०.०९.२०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर पदांवरील खर्च खालील लेखाशिर्षातून खर्ची घालण्यात यावा आणि हा खर्च सन २०१८-२०१९ या वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

मागणी क्रमांक-आर-१

२२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

००१ - नागरी आरोग्य सेवा - विषम चिकित्सा

११० - रुग्णालये व दवाखाने

११०-(६) मनोरुग्णालये (२२१० ०२१७)

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आपुक,दि.- ०५.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०२१८३३५४८०१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shamraoji Kaurte

Digitally signed by Rajendra Shamraoji Kaurte
DN: CN = Rajendra Shamraoji Kaurte, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.04.03 17:31:34 +05'30'

**(रा.शा.कौरते)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) ( लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई
३. संचालक,आरोग्य सेवा, मुंबई.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा, (अ व प्र)/ (मानसिक आरोग्य) मुंबई.
५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखाधिकारी, मुंबई.
७. वित्त विभाग व्यय-१३/ वित्तीय सुधारणा-१, मंत्रालय, मुंबई.
८. कार्यासन अधिकारी, सेवा-२/सेवा-३/ सेवा-५/अर्थसंकल्प, सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
९. निवडनस्ती आरोग्य-३अ

<u>विवरणपत्र</u>

आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या आस्थापनेवरील ४२ अस्थाई पदे दि.०१.३.२०१८ ते ३०.९.२०१८ पर्यंत पुढे चालू ठेवणेबाबत.

| अ. क्र. | पदनिर्मितीचा शासन निर्णय, क्रमांक व दिनांक | पदनाम | पद संख्या | वेतनश्रेणी | ज्या शासकीय आदेशान्वये पदे चालू ठेवली त्याचा क्रमांक व दिनांक | लेखाशिर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शासन निर्णय.सा.आ.वि.क्र. पदआ २००७/प्रक्र-११७/सेवा-१,<br>दिनांक ०६/०८/२००७. | सहायक संचालक (मा.आ) | ०१ | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | सा.आ.वि शासन निर्णय क्रमांक क्र.अपदे २०१७/प्रक्र-७२/आरोग्य ३(अ) दि.२२.१.२०१८. | **<u>मागणी क्रमांक आर-१</u>**<br>२२१०-वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य<br>००१-नागरी आरोग्य सेवा व विषम चिकित्सा<br>११०-रुग्णालये व दवाखाने<br>११०(६) मनोरुग्णालये<br>( २२१० ०२१७) |